।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

ज्ञानामृतं भोजनम्।

# पाझर अमृताचा

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

◈ वर्ष ८ वे ◈ अंक ३ रा ◈ अश्विन-कातिक-मार्गशीर्ष-पौष शके १९३३ ◈ २८ सप्टें. २०११ ते २३ जाने. २०१२

**प्रकाशक व मुद्रक:**

**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**

**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**

**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**

**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा, उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**

## अंतरंग


- **Good Behaviour**
  - श्रीसस माधुरीनाथ ०३
- **रुचि रुचि भोजन -** ०५
- **भक्तगाथा -** ०८
- **गोजिरवाणी -**
  सौ. नीता कुलकर्णी १०
- **गुंजारव - १ - २ -**
  - रोहन पंडीत ११
- **शब्द तेचि छेडीता**
  - मुधरा १२
- **अहो ऐकलतं का? -**
  - शुभांगी मोकाशी १६
- **उत्सव विशेष -** १९

## *Good Behaviour*

- श्रीसस माधुरीनाथ

# वैश्विक एकात्मतेकडे नेणारा एक मार्ग...✍ सदाचरण

**सद्गुरू** - विश्वातील प्रत्येक वस्तुला एक विशिष्ट रुपाकार आहे आणि त्या त्या वस्तुच्या ओळखीसाठी नामही आहे. त्या-त्या वस्तुचे अस्तित्व हे परब्रह्मीचे अस्तित्वच असते. वस्तू अस्तित्वात असते, म्हणून भासते. तिचे भासकत्व हे परब्रह्मींच्या संवेदनशीलतेचा परिणाम आहे. तुम्ही (सर्वसामान्य जीव) आनंद अनुभवू शकत नाही, कारण तुमच्या देहापासून वेगळे निघत नाही. अशाप्रकारे विश्वातील प्रत्येक वस्तुचे पाच भागात विश्लेषण करता येते. १) अस्तित्व २) भासकत्व ३) आनंदत्व ४) नाम ५) रूप


या पाचा पैकी पहिले तीन १) अस्तित्व २) भासकत्व ३) आनंदत्व हे परब्रह्मीचे गुणधर्म (लक्षणे) आहेत आणि उर्वरीत दोन म्हणजे नाम आणि रूप ही मायेची लक्षणे आहेत. रुपाकार हा 'ॐ' कारातील 'अ' कार आहे. नाम हे 'ॐ' कारातील 'ऊ' कार आहे की जे त्या-त्या रुपाकारातील वस्तुमान एकत्रित बांधून ठेवते आणि विश्वातील इतर वस्तुमानात त्याला विरून जाऊ देत नाही. आनंद हा 'ॐ' कारातील 'म' कार आहे. भासकत्व हे 'ॐ'कारातील ◡ मात्रा आहे. अस्तित्व हे 'ॐ' कारातील बिंदू आहे. नाम आणि रुपाकार हे मायाभ्रमाचे गुणधर्म (लक्षणे) बदलू शकतात. परंतु परब्रह्मीचे गुणधर्म जसेच्या तसेच राहतात. लाकडी ओंडक्याचे उदाहरण लक्षात घे. तो असतो म्हणून भासतो. तो स्वयंपाकासाठी किंवा इतर आपल्याला जी वस्तू तापवायची असेल ती तापवण्यासाठी जाळ निर्माण करायला उपयोगी पडतो. अशाप्रकारे तो सुखरूप ठरतो. नाव लाकडी ओंडका, रुपाकार तू पाहतोस तो आहे. आता तो जाळल्यानंतर ओंडक्याचे रुपांतर राख, उष्णता आणि प्रकाश यामध्ये होते. ते सर्वही असतात, भासतात आणि उपयुक्ततेमुळे आनंददायी असतात. त्यांना नावे आहेत. राखेला रुपाकारही आहे. उष्णता व प्रकाश यांना हातानी धरता येईल अशी स्थूळ

आकृती नाही. परंतु त्यांना आपण अनुभवू शकतो आणि विश्वातील इतर पदार्थापासून वेगळेपणाने स्पर्श त्वचेने,रुप डोळ्यांनी असे ज्ञानेंद्रियांच्या सहाय्याने ओळखूही शकतो. अशाप्रकारे नाम आणि रूपाकृती बदलली तरी परब्रह्मींची लक्षणे मात्र जशीच्या तशी राहतात.

फक्त एकच वस्तु अविनाश आहे ती म्हणजे परब्रह्म! बाकी सर्व पंचतत्वे परस्पर अंतर्गत परिवर्तनशील आहेत आणि म्हणूनच अविनाशी नाहीत.

हाच वस्तुच्या अविनाशी तत्वाचा खरा नियम आहे की जो न्यूटनच्या वस्तुमान आणि ऊर्जा यांच्या अविनाशीत्वाच्या नियमाचा विस्तार आहे. अशाप्रकारे विश्वातील प्रत्येक पदार्थांत परब्रह्म तू अनुभवू शकतोस आणि नामरूपात्मक मायाभ्रम हाच जणू खोटा बुडबुडा आहे तो जीवाला बंधनात टाकतो. अशाप्रकारे साधकाने विचारसरणी बदलली असता आणि या ब्राह्मीस्थितीवर शांत आणि सुदृढ राहिले असता त्याचे चारी देह ब्रह्मरूप ठरतात. ते असत्-जड-दुःखरुप उरणारच नाहीत. परंतु सत्-चिद्-आनंदरूप ठरतील. असा देह स्वरूपाचा दैवी आनंद घेण्यासाठी व्यासपीठ ठरते. तुला समजले का?

**शिष्य** - होय महाराज! येथे मला एक शंका विचारायची आहे की ईश्वरी संकेत म्हणजे काय? कृपया मला आधुनिक शास्त्राच्या परिभाषेतून समजावून सांगा ना!




**सद्गुरू** - बहुतेक तू भौतिक शास्त्र आणि एकाच बिंदूवर कार्यरत असलेल्या बलांचे (सदिश राशी) परिणामी बल काढण्याचा (बलांच्या बेरजेचा) समांतर भुज चौकोन नियम शिकला असशील. जर $\overline{a}$ आणि $\overline{b}$, o या एकाच बिंदूवर कार्यरत असलेले दोन वेगवेगळे बल $\overline{OA}$ आणि $\overline{OB}$ यांनी दर्शविलेले असतील तर $\overline{a}$ आणि $\overline{b}$

यांचे परिणामी बल $\overline{r} = \overline{a} + \overline{b}$ हे O मधून जाणाऱ्या कर्णाच्या लांबीइतके असते आणि कर्णाच्या दिशेने परिणामी बल कार्यरत असते. अशाप्रकारे जरी $\overline{r}$ असे कोणतेही बल प्रत्यक्षात नसले तरी हालचाल होते ती $\overline{OR}$ दिशेत आणि परिणामी बल असते $\overline{a} + \overline{b}$ जे ह्या दोघांतील प्रत्येकापेक्षा मोठे असते. विश्वातील प्रत्येक कणाची हालचाल ही त्यावर कार्यरत असलेल्या सर्व बलांचे परिणामी बलाच्या दिशेने घडत असते. या परिणामी बलालाच ईश्वरी संकेत म्हटल्या जाते. ईश्वर नावाची कोणतीही एक व्यक्तीरेखा नाही. तुला आता ईश्वर म्हणजे काय आणि जीव म्हणजे काय हे कळले का?

**शिष्य :** ईश्वर तसेच जीव हे स्फुरणरूप आहेत. मला असे वाटत होते की कोणीतरी सामर्थ्यवान व्यक्तीमत्त्वाने हे जग तयार केले आणि या जगाचे अनुशासन करीत आहे. परंतु इथे तर ईश्वर नाव देण्यास कोणतीही व्यक्तीरेखा नाही. मला वाटतं सर्व जीवच आहेत. बरोबर आहे ना?

**सद्‌गुरु :** होय तू जे म्हणत आहेस ते अगदी बरोबर आहे. नामामुळेच हा सर्व घोटाळा आहे. एक जीव म्हटल्या जातो आणि दुसरा सर्व जीवांची गोळाबेरीज असल्यामुळे विश्वात्मा म्हटल्या जातो. एकदा का आपली समजूत पटली आणि स्थूळ आणि सूक्ष्म देहाची मिथ्या मालकी सोडून दिली तर ईश्वराचा वरचढपणा तुम्ही डावललातच! विविध रूप आणि आकारमानांशी संबंधित नामांकडे दुर्लक्ष करून परब्रह्माच्या स्वरूप लक्षणांकडे निरिक्षणपूर्वक पहा.

**शिष्य** - महाराज, ही स्वरूपलक्षणे काय आहेत?

(क्रमशः)

## रुचि रुचि भोजन करो मोरे लाला...

भक्ति हेचि भावे, परब्रह्म पक्वान्न। गुरुमुखे जेवण जेवियेले।।धृ।।
स्वानुभव भात, लय लक्ष कढी। जेवणारा गोडी घेत असे।।१।।
सुख शांती शाखा, भावार्थ हा वडा। जेवणारा गाढा आत्माराम।।२।।
दया क्षीर धारी, शांती पुरणपोळी। घृत रे कल्लोळी प्रेम तुझे।।३।।
विषयाचा गुरळा, थुंकूनी सांडीला।। नामा आंचवला संसारासी।।४।।

# भक्तगाथा...

पत्रावळीवाल्यांच्या मंदिराशेजारी रंगोपंत या नावाचे सद्गृहस्थ राहत असत. रंगोपंत हे इंदूर येथील सुप्रसिद्ध लक्ष्मण महाराज यांचे अनुयायी होते. श्री लक्ष्मण महाराज हे दत्तसाक्षात्कारी श्री नारायण महाराज जालवणकर यांचे प्रमुख शिष्यवृंदापैकी होत. श्री नारायण महाराज हे झाशीजवळील जालवण गावचे रहाणार त्यांच्या वडिलांचे नाव तात्या पुराणिक. हे देशस्थ ब्राह्मण होते. झाशींच्या राजाच्या पदरी वेतन घेऊन तात्या पुराण वाचीत असत. पुत्रप्राप्तीसाठी त्यांनी श्रीमन्महाभागवताची शंभर पारायणे केली. नंतर त्यास शके १७२९ आषाढ व. ५ रोजी गुरुवारी एक पुत्र झाला. त्याचे नाव नारायण ठेवले. नारायण महाराजांची मातोश्री लहानपणीच वारली. त्यांचा सांभाळ त्यांच्या आजीनेच केला. नारायण महाराजांची मुंज आठव्या वर्षी झाली. नंतर दोन वर्षांनी वडिलांच्या आग्रहास्तव त्यांचे लग्न झाले. पुढे थोड्याच दिवसात त्यांना पूर्व संस्काराने वैराग्य उत्पन्न होऊन ते सद्गुरूंच्या शोधात निघाले. गोवर्धन बाबा नावाच्या एका हटयोग्यांची व त्यांची गाठ पडून त्यांनी त्यांच्याकडून अनुग्रह घेतला व काही वर्ष त्यांच्याजवळ योगाभ्यास केला. नारायण महाराजांच्या वडिलांना मुलाचा शोध न लागल्यामुळे शोक झाला व त्यांनी त्यांच्या शोधार्थ गावोगावी माणसे पाठवली. एका गृहस्थास मुलाचा शोध लागला व त्याने गोवर्धन बाबांची परवानगी घेऊन नारायण महाराजास घरी आणले. नंतर नारायण महाराज एक सवंत्सरपर्यंत घरी राहिले. त्यास एक मुलगा झाला. पण तो व त्याची आई थोड्याच दिवसात वारली. पुढे नारायण महाराज गिरनार पर्वती तपानुष्ठान करण्यास गेले. दत्त साक्षात्कार व्हावा म्हणून अन्नपाणी वर्ज्य करून १४ दिवस उपवासी राहिले. चौदावे दिवशी दत्तदर्शन होत नाही असे पाहून पर्वताच्या कड्यावरून उडी टाकण्याच्या हेतूने उभे राहिले. इतक्यात फकीर वेषात श्री दत्त पुढे आले व त्यांनी नारायण महाराजांचा हात धरून त्यांना एका गुहेत नेले. तेथे साक्षात् दर्शन देऊन त्यास ब्रह्मविद्येचा बोध केला व त्यास पुढील अभ्यासाकरिता त्या गुहेतील श्री निरंजन स्वामींच्या स्वाधीन केले. तेथे काही वर्षे राहून पूर्णता प्राप्त करून घेतल्यावर त्यास जगदुद्धार करण्यास श्री दत्तांची आज्ञा झाली. नंतर ते प्रथम गिरनार पर्वतावर गेले व तेथे काही दिवस राहून माळव्यात आले व इंदूर, देवास, धार, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणी त्यांनी सांप्रदायाचा प्रसार केला.

पुढे त्यांनी तीर्थयात्रा करीत ब्रह्मावर्तास येऊन परमहंस दिक्षा घेतली तेथेही त्यांची शिष्यमंडळी पुष्कळ झाली. पुढे ते पुन्हा ग्वाल्हेर येथे गेले. तेथे काही दिवस राहून ते काशीस राहण्यास गेले. काशीस गेल्यावर ग्वाल्हेरच्या महाराजांनी बोलविले, पण ते तेथे गेले नाहीत. काशीस जवळ जवळ एक तप काढले. तेथे दररोज करूणापर ओव्या सहजस्फुर्तीने त्यांच्या मुखातून निघत असत. या ओव्यांची संख्या सुमारे १७६४२ झाली. या समग्र ग्रंथास 'करुणासागर' असे नाव आहे. या ग्रंथाप्रमाणे मोठमोठाले ओवीबद्ध ग्रंथ त्यांनी ९/१० लिहीले आहेत. त्यापैकी बोधसागर, विज्ञानसागर वगैरे सप्तसागर हे प्रमुख होत. नारायण महाराजांच्या गुरुपरंपरेतील आद्य गुरु हंस, हंसानी ब्रह्मदेवास, ब्रह्मदेवाने अत्रीस, अत्रींनी दत्तास, दत्तात्रेयांनी नारायण महाराजांस उपदेश दिला. नारायण महाराजांच्या अंगावर एक भगवे वस्त्र, पायात पादुका, रेशिमकाठी धोतर, उजव्या हातात चिमटा, बोटात हिऱ्याच्या अंगठ्या, कानात भिकबाळी, डोक्यावर जटा बांधलेल्या, कपाळी केशरी गंध, हनुवटीवर लहानशी गाठ बांधलेली दाढी याप्रमाणे त्यांचा वेष असे. नारायण महाराजांच्या अनेक शिष्यांपैकी नारायण महाराज (देवास), सखाराम बाबा, लक्ष्मण बाबा व बाळागुरुजी ढेकणे (धार) हे प्रमुख होत. नारायण महाराज हे आपल्या वयाच्या ६० वर्षी समाधिस्थ झाले.

श्री लक्ष्मण महाराज वेलणकर लहानपणापासूनच धार येथे कोकणातून आले. धार येथील रघुनाथपुऱ्यातील दत्तमंदिरात श्री नारायण महाराज जालवणकरांचा मुक्काम असे. या मंदिराचा शेजारील बाळागुरुजींच्या कृष्णमंदिरात श्री लक्ष्मण महाराज रहात असत. त्यांचे बाळबोध अक्षर सुंदर असल्यामुळे धार येथील शिळाछापाच्या कारखान्यात काही दिवस नोकरी केली होती. बाळपणापासूनच परमार्थाकडे प्रवृत्ति असल्यामुळे श्री नारायण महाराजांची गाठ पडून त्यांनी त्यांच्यावर कृपा केली व नंतर नारायण महाराज काशीस गेले. नारायण महाराजांचे पट्ट शिष्य बाळागुरुजी ढेकणे हे नित्य श्री नारायण महाराजांच्या ग्रंथांचे वाचन, पुराण, कथा इ. करीत असत. श्री लक्ष्मण महाराज ही तेथे पुराण अथवा कथा करीत. श्री लक्ष्मण महाराज गौरवर्ण व स्वरूपाने सुंदर असून भजन फार मधुर व प्रेमळ करीत. त्यांचे कीर्तनही रसाळ असे. त्यांच्याच एका भक्ताने त्यांना इंदूर येथे आल्यावर एक कृष्णमंदिर बांधून दिले. या कृष्णमंदिरात त्यांची कथा, प्रवचन, पुराण वगैरे नेहमी होत असे. श्री लक्ष्मण महाराजांचे कीर्तन व भजन ऐकण्यास रंगोपंत बहुतेक रोज येत असत.

बलभीम बोवांची प्रेमळवृत्ती व परमाप्तप्राप्ती विषयी आतुरता पाहून रंगोपंतास बोवांबद्दल आदर वाटे. बोवांची व लक्ष्मण महाराजांची गाठ पडली तर बरे होईल असे त्यांना वाटे. एकदा बोलत बसले असताना रंगोपंत त्यास म्हणाले, ''बोवा! येथील आडवे बाजारातील श्री कृष्ण मंदिरात श्री लक्ष्मण महाराज नावाचे सत्पुरुष आहेत. त्यांच्या भेटीस आपण अवश्य जावे. ते अनुभवी असल्याने आपणांस त्यांचा फायदा होईल.'' यावर बोवा म्हणाले, ''माझे समाधान करणारा अजून भेटला नाही. मंत्र, तंत्र, चमत्कार व चेटुके करणारे गुरु मला नकोत. गुरुबाजी करणे हा राजरोज पैसा लुटण्याचा व भोळ्या लोकांस भोंदण्याचा मार्गच होऊन बसला आहे. ब्रह्मनिष्ठ, शिष्याच्या चित्तातील सर्व संशय घालविणारा, शांत, दांत व उदार असा जो असेल तोच खरोखर सद्‌गुरु म्हणावा, असे शास्त्र सांगत आहे, रंगोपंत! 'देव दावी ऐसा कोण भेटे गुरु! तयाचा उपकारू माझे माथा।।' खरा साधु भेटणे हे महत्पुण्याईचे फळ आहे. रंगोपंत! अजुन माझ्या अंतरात तितका पुण्याईचा साठा झालेला नाही असे दिसते. काही तरी माझेच ठिकाणी महादोष असला पाहिजे यात शंका नाही. खऱ्या सत्पुरुषाचे पाय केव्हा भेटतील ही तळमळ मात्र माझे चित्तात आहे. यात संशय नाही.

रंगोपंत म्हणाले, ''बोवासाहेब आतापर्यंत असे अनेक सत्पुरुष पाहिलेत तसेच एकवार या सत्पुरुषाचे दर्शन घेऊन पहा. ज्याप्रमाणे अनेक वैद्यांचे औषध घेतल्यानंतर निर्वाणाचे म्हणून एखाद्या वैद्याचे औषध घ्यावे व गुण न आल्यास सोडून द्यावे. त्याप्रमाणेच या सत्पुरुषापासून तुमचे समाधान झाले तर ठिक, नाहीतर त्यांचा नाद तुम्ही सोडून द्या.''

याप्रमाणे बोलणे झाल्यावर रंगोपंतांच्या आग्रहास्तव एके दिवशी बोवा त्यांचेबरोबर दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास श्री लक्ष्मण महाराजांच्या कृष्ण मंदिरात गेले. त्यावेळेस श्री लक्ष्मण महाराज योग वसिष्ठ सांगत होते. सभोवती ४०/५० मंडळी जमली होती. वक्ता व श्रोते यांचे एकचित्त झाले होते. तो देखावा पहाताच बलभीम बोवांच्या मनावर वेगळाच परिणाम झाला. सुमारे १५ मिनिटे रंगोपंत व बोवा बाहेर उभे राहून श्रवण करीत होते. आजपर्यंत जेवढे सत्पुरुष पाहिले त्यापेक्षा येथे काही जास्त व अनुभवाचे असावे असे वाटले. श्री लक्ष्मण महाराजांची मूर्ती देखणी होती. त्यावेळेस एक गुलाबी रंगाची शाल पांघरलेली होती. डोक्यावर एक हरमुजी रंगाचा फेटा, कपाळी तिरेघी उभे गंध लावलेले, गळ्यात रूद्राक्षाची माळ, सहजासन घातलेले, हातात योगवसिष्ठाचे एक पान, सर्व चेहऱ्यावर दिव्य तेज चमकत असलेले व मुखातून

प्रवचनाचा गंभीर व अस्खलित प्रवाह चाललेला! याप्रमाणे ती शांत मूर्ती पाहताच बोवांचे मन थोडावेळ स्तब्ध झाले. मनःपटलावर त्या सगुणमूर्तिचे चित्र कायमचे उठले गेले. रंगोपंत व बोवा थोड्यावेळाने मंदिराच्या आत जाऊन एका कोपऱ्यात हळूच बसले. महाराजांच्या प्रेमळ भाषणामुळे बोवांचे चित्त इतके रंगून गेले की पुराण संपल्यावरही उठावेसे वाटेना. पुराण संपले तरी बोवा आपल्या जागेवरून हलत नाहीत व ते अधोमुख करून तटस्थ बसले आहेत असे वाटत रंगोपंतानी बोवास हलकेच म्हटले, ''बोवा! महाराजांकडे चलता ना?'' बोवांना रंगोपंतांचे बोलणे ऐकूच आले नाही. बोवांची ही स्थिती पाहताच रंगोपंतानी त्यास हलक्या हाताने हलविले व लक्ष्मण महाराजांजवळ नेले. त्यांच्याजवळ जाताच बोवांनी महाराजांना साष्टांग नमस्कार करून त्यांचे दोन्ही चरण घट्ट धरले व त्यांच्या चरणास प्रेमाश्रुंनी स्नान घातले. महाराजांनी बोवास आशीर्वाद देऊन त्यांची माहिती विचारली. त्यांच्या मुखातून एकही शब्द उमटेना हे पाहून महाराजांनी रंगोपंतांना बोवांचे नाव, गाव विचारले. रंगोपंतांनी बोवांविषयी सर्व हकिकत सांगितली. ती ऐकून व बोवांचे कोमल व भावप्रधान अंतःकरण पाहून महाराजास फार आनंद झाला. त्यांनी त्यास गाढ आलिंगन देऊन आपल्या जवळ बसविले दुसरे दिवशी बोवा रंगोपंताना आपण होऊनच म्हणाले,'रंगोपंत! चलता ना पुराणाला?'' हे ऐकून रंगोपंतांना आनंद झाला व दोघे नित्य पुराणास जाऊ लागले. चार पाच दिवसांनी पुराण झाल्यावर बोवा महाराजांच्या चरणी साष्टांग नमस्कार घेऊन हात जोडून नम्रपणे म्हणाले,''महाराज देव दावी ऐसा कोण भेटे गुरु। तयाचे उपकार माझे माथा। आजपर्यंत षण्मुखीमुद्रा, जप, तप, वृत्ते वगैरे साधने केली. तीर्थ यात्रा केल्या, घरदारही सोडले. पण परमात्मदर्शन झाले नाही व त्याविषयी चित्तात एकसारखी तळमळ लागली आहे. आपण कृपा करून योग्य तो मार्ग दाखवून माझे समाधान कराल का?'' हा प्रश्न ऐकताच श्री लक्ष्मण महाराजांस अत्यंत आनंद झाला व ते बोवास म्हणाले,''आपले मनोरथ श्रीकृपेकरून पूर्ण होईल. बाळबोध व विमल स्वरूपज्ञान, आत्मस्थिती व निश्चयाचे समाधान हे ज्याचे पासून तुम्हाला प्राप्त होईल तोच सद्गुरु जाणावा. इतर नव्हे! तुमच्या सर्व शंकाचे निरसन प्रभूकृपेकरून मी करीन. तुम्ही काळजी करू नका. जर तुमचे निश्चित समाधान झाले नाही तर ज्या सत्पुरुषाजवळ खरे तत्त्वज्ञान असेल त्याच जवळ मी तुम्हास नेऊन तुमची खात्री

**पान नं. १३ वर**

# गोजिरवाणी...✍

**- सौ. नीता कुलकर्णी**

**आजी-** आज मी तुम्हाला एक वेगळीच गोष्ट सांगणार आहे.

**मुले-** सांग ना आजी!

**आजी-** अरे एक राजकन्या होती. ती धर्मशास्त्र पारंगत होती. पण ती दुराभिमानी होती. तिने तिच्या लग्नाची एक अट घातली होती.

**मुले-** कोणती?

**आजी-** अरे जो कोणी शास्त्रावरील वादविवादात तिला हरवेल त्याच्याशी ती लग्न करेल. पण जो हरेल त्याचे मात्र मुंडण करून गाढवावर बसवण्यात येईल.

**मुले** - मग, मग आजी काय झाले?

**आजी** - अनेक युवकांना तिने हरविले. त्यामुळे अपमानित झालेल्या युवकांनी तिची खोड मोडण्याचे ठरविले. त्यांनी तिचे लग्न एखाद्या महामुर्खाशी करण्याचे ठरविले. अशाच मुर्खाच्या शोधात असताना त्यांना एक तरुण झाडावर बसलेला आढळला. तो फांदीच्या टोकावर बसून मूळावर घाव घालीत होता.

**मुले** - बापरे! वेडाच होता का?

**आजी** - अरे एवढा महामुर्ख दुसरा नसेल हे जाणून त्या युवकांनी त्याला चांगली वस्त्रे, चंदनाचा टिळा, पगडी घालून तयार केले. त्याला मात्र त्यांनी मौन धरण्यास सांगितले.

**मुले** - मग, राजकन्या कशी बोलली?

**आजी-** अरे, त्यांनी राजकुमारीला तो पंडित असल्याचे सांगून, तो मौनधारी असल्याने मुकविवाद करतो असे सांगितले. मग राजकन्येने त्याच्याशी खाणाखुणांनी वाद करण्यास सुरुवात केली. प्रथम तिने एक बोट दाखवून 'ब्रह्म एक आहे' असे सांगितले. इकडे या मुर्ख युवकाला 'मी तुझा एक डोळा फोडीन' असे वाटले व त्याने 'मी तुझे दोन्ही डोळे फोडीन' या अर्थाने दोन बोट दाखविली.

**मुले (हसून)** - गंमतच आहे.

**आजी-** अरे ऐका नं! इकडे राजकन्येला वाटले की तो सांगत आहे, 'माया व ब्रह्म दोन रुपे आहेत.' नंतर तिने हे 'विश्व पंचमहाभूतांचे बनलेले आहे.' या अर्थी पाच बोटे

दाखविली. इकडे त्या युवकास ही 'मी तुला थप्पड मारीन' असे म्हणते आहे असे वाटून त्याने प्रथम पंजा उगारला व नंतर त्याची मूठ बनवून 'आपण गुद्दा मारू' असे सुचवले.

**मुले** - मग राजकन्येला काय वाटले आजी?

**आजी**- तिला वाटले हा म्हणतो आहे की पंचमहाभूते मिळून एक शरीर किंवा वस्तू निर्माण करतात. अशाप्रकारच्या वादविवादात अखेर राजकन्येने पराभव मान्य केला व तिचा विवाह त्या युवकाबरोबर झाला.

**मुले** - मग तिला समजले तो मूर्ख आहे?

**आजी** - अरे हो, पहिल्या रात्रीच तिला आपली घोर फसवणूक झाल्याचे समजले व तिने त्याला झिडकारले. इकडे हा मूर्ख युवक फार नाराज झाला व नदी किनारी जीव द्यायला गेला.

**मुले** - पुढे काय झाले?

**आजी** - तिथे अनेक स्त्रिया कपडे धुवत होत्या. याचे लक्ष तिथल्या दगडांवर गेले व त्याच्या लक्षात आले की कपडे ज्या दगडावर आपटले जात होते ते दगड गुळगुळीत होते व इतर दगड अणकुचीदार होते. झटकन त्याच्या डोक्यात प्रकाश पडला, जर कापडाने दगडांचा आकार बदलतो तर ज्ञानाच्या घावाने माझे मट्ठ डोके का सुधारणार नाही! याच विचाराने पुढे त्याने खूप कष्ट घेऊन ज्ञानार्जन केले व पंडित होऊनच घरी परतला.

**मुले** - मग त्याच्या बायकोला म्हणजे त्या राजकन्येला काय वाटले?

**आजी** - अरे आल्याबरोबर तिने त्याला 'अस्ति कश्चित वागार्थः।' म्हणजेच 'काही अर्थपूर्ण बोलणार आहेस का?' असा प्रश्न केला. तेव्हा तिला या तीनही शब्दांनी सुरु होणारी 'कुमारसंभवं', 'मेघदूत' व 'रघुवंश' ही दीर्घकाव्ये रचूनच त्याने प्रत्युत्तर केले. सांगा बर मुलांनो ओळखले का ही गोष्ट कोणाची?

**मुले** - आजी, महाकवी कालिदास का गं?

**आजी** - बरोबर! अरे हाच पुढे महाकवि कालिदास ठरून राजाच्या नवरत्नांतील मानकरी होऊन अजरामर झाला. सांगा बरं मुलांनो तुम्ही यातून काय शिकलात?

**मुले** - राजकन्येसारखा दुराभिमान आपले नुकसानच करतो. तसेच कालिदासाने कष्ट करून ज्ञानाने आपल्या मुर्खपणावर मात केली

**आजी** - बरोबर! अरे अपमानित झाल्यावर नुसताच नाराज होऊन तो बसला नाही. तर स्वकष्टाने त्याने आपल्यातील कमतरता नुसतीच दूर केली नाही तर तो साहित्याच्या इतिहासातील एक सोनेरी पान ठरला!

◈◈◈

# शब्द तेचि छेडिता, अर्थ उमगले नवे
# आज लाभले सखी, सौख्य जे मला हवे...✍

**- मधुरा**

मैत्रिणीला मोबाईल कॉल लावला व तिकडून 'तुमसे ही...' गाण्याची कॉलर ट्यून ऐकू आली. बरं झालं तिने फोन उचलला नाही कारण गाणे मनात रेंगाळू लागले.

ना है ये पाना, ना खोना ही है
तेरा ना होना जाने क्युँ होना ही है

अरे, हे तर गुरुदेवांचेच शब्द आहेत. आपल्याला देहाने काही मिळवायचे नाही आणि गमवायचेही नाही. असेच नाही का? आणि गुरुदेव देहाने जवळ नसले तरी ते या ना त्या रुपाने आपल्याला मार्ग दाखवतातच ना! कधी मैत्रिण, कधी आई, आजी, टीचर तर कधी एखाद्या सहप्रवाशाच्या रुपात सुद्धा नाही का?

तुमसे ही दिन होता है, सुरमई शाम आती है
तुमसे ही, तुमसे ही
हर घडी साँस आती है, जिंदगी कहलाती है
तुमसे ही, तुमसे ही

खरचं पूर्वीही दिवस उगवत होताच ना! पण आता मात्र सहजच वाटते की दिवस तुमच्यातूनच सुरु होतो व सुंदर संध्याकाळच्या रूपातही गुरुदेवच भेटतात. प्रत्येक क्षणही तुमच्या भोवतीच बांधला आहे. मनातील गाणे पुढे पुढे सरकत होते.

आँखो में आँखे तेरी बाहोमें बाहें तेरी
मेरा ना मुझमें कुछ रहा, हुआ क्या?
बातो में बातें तेरी, राते सौगातें तेरी
क्युँ तेरा सब ये हो गया हुआ क्या?
मैं कही भी जाता हूँ, तुमसे ही मिल जाता हूँ
तुमसे ही, तुमसे ही

आमचे डोळे पूर्वीचेच आहेत. पण दृश्यांचे अर्थ बदललेत! कारण आता तुम्ही आमच्या डोळ्यात असता. आमच्याकडून एखादे कार्य झाले तरी 'त्याच्या' मुळाशी तुमचेच बाहू असतात. कारण तुम्ही आम्हाला तुमच्यातच सामावले आहे. आमच्या

बोलण्यातही तुम्हीच असता कारण वाणीही तुमचीच आहे. हे सगळे तुमचेच झाले आहे. महाराज, तुम्हीच आम्हाला आपले रूप आमच्यातही दाखवले व बाहेरही दाखवले. म्हणूनच तर आम्ही कोठेही गेलो तरी तुमच्यातच मिळून जातो.

शोर में खामोशी हैं, थोडीसी बेहोशी है।
तुमसे ही, तुमसे ही

आणि म्हणूनच मनातील गोंधळ, आरडाओरड यांना फाटे देत आम्ही शांततेकडे खेचले जातो आणि जगाच्या चिंतेपासून आम्ही बेहोशच होतो नाही का?

आधासा वादा कभी, आधेसे ज्यादा कभी
जी चाहे कर लूं इस तरह वफ़ा का...
छोडे ना छुटे कभी तोडे ना तुटे कभी
जो धागा तुमसे जुड गया वफा का...

हे सगळे झाले तरी काय होते, आम्ही बोधात दिलेले वचन, 'मी ब्रह्म' असल्याचे ते कधी अर्धे पाळले जाते तर कधी त्याहून अधिक! पण महाराजांशी आम्ही जे बांधले गेलोय ते प्रेमाच्या धाग्यात! ते तोडू म्हणता तुटणार नाही, सोडू म्हणता सुटणार नाही. कारण तो प्रेमाचा धागा घट्ट आहे. कधीही न तुटणारा!

मैं तेरा सरमाया हूँ, जो भी मै बन पाया हूँ
तुमसे ही, तुमसे ही
रास्ते मिल जाते है, मंजिले मिल जाती हैं
तुमसे ही, तुमसे ही

खरचं महाराज, आज जे आम्ही आहोत ते केवळ तुमच्या मुळेच! तुम्हीच आमचा नजरियाँ बदललात! तुम्हीच आम्हाला यशाचा, शांततेचा, पूर्णत्वाचा रस्ता दाखविलात, तुम्हीच आम्हाला त्यावरून कळसाकडे नेलतं! खरचं महाराज, **तुमसे ही तुमसे ही!**

◈◈◈

---

**पान नं. ०९ वरून**

करून देईन. आत्मप्रतिती, शास्त्रप्रतिती व गुरुप्रतिती या तिन्हीची एकवाक्यता झाली पाहिजे. तरच समाधान होईल.'' असे सांगून त्यांनी बोवांस दुसरे दिवशी सकाळी ७ वाजता यावयास सांगितले.

◈◈◈

# गुंजारव - ९

**- रोहन पंडीत**

## आपली माणसं

आपली माणसं, ही नक्की कोण असतात?
ज्यांनी आपल्याला जन्म दिला, त्या आई-बापाचे
कर्तव्य म्हणून आपल्याला जगवणारी...
का त्यांच्या स्वतःचा जीव, आपल्यावरील प्रेम
म्हणून वाढवणारी?
आपल्याला कमी पडेल म्हणून स्वतः कमी खाणारी
का भरपूर खायला देऊन लाडावून ठेवणारी
दुसऱ्याला कसलही व्यसन लागू नये म्हणून
स्वतः कुठलही व्यसन न ठेवणारी
का परदेशातून खास imported दारू आणणारी?
गरज पडली की हातचं काम सोडून धावत येणारी,
का रोज एकदातरी विचारपूस करायला येणारी?
जिभेचे चोचले पुरवायचे म्हणून बाहेर खायला नेणारी,
का पौष्टीक अन्न मिळावं म्हणून नियमीत घरी जेवण करून देणारी
आपले भले व्हावे म्हणून आपल्यावर बंधन लादणारी,
का आपल्याला स्वच्छंदीपणे वागु देणारी?
माणसं दूर सोडा, निसर्गाला आपण आपलेच मानले
आहे, पण तरी...
हा वादळ, भूकंप, सूनामी अशा विविध
गोष्टींतून त्रास देतोच की नाही?
जगामध्ये आपले नक्की कोण आहे, जे
आपल्यावर प्रेम करतात ते, का
ज्यांच्यावर आपले प्रेम आहे ते

खरं तरं जगात कोणीच कोणाचं नसतं...
आपणच आपले एकले असतो
एकला जीव सदाशीव असतो
एकला जीव सदाशीव असतो.

## गुंजारव - २

**- रोहन पंडीत**

आठवणी ह्या केवळ घडून गेलेल्या घटना नसतात,
ते असे काही क्षण असतात जे आपल्या नकळत
ह्रदयामध्ये साठवून ठेवले जातात

वहीमध्ये ठेवलेल्या गुलाबाप्रमाणे कोमेजून जरी गेल्या,
तरी वहीचे ते पान उघडल्यावर गुलाबाच्या सुगंधासारखं
मनात भावना दरवळून जातात

हवेत तरंगणाऱ्या पानासारखं त्या अलगद, मनाच्या
तलावात येऊन पडतात,
अन् भावनांचे तरंग मनात पसरवून टाकतात

प्राण असेपर्यंत त्या सदैव आपल्यासोबतच असतात,
कधी मनोरंजनाचे साधन बनतात, तर कधी दुःखाचे कारण
कधी खुद्कन हसवतात तर कधी टचकन् डोळ्यातून आसु काढतात

आठवणी कधीच चोरता येत नाहीत, ना कोणाला देता येतात,
त्या फक्त share करता येतात.
आपल्या अंतःकरणात साठवलेल्या त्या अमूल्य धन असतात,
मात्र, अखेरीस त्या देहाबरोबरच खाली सोडून द्याव्या लागतात.

◈◈◈

# अहो ऐकलतं का?...✍

**सौ. शुभांगी मोकाशी**

## संत संग देई सदा!

अलिकडील काही दिवसात बरेच दिवस प्रत्यक्ष गुरुदेव भेटले नाहीत, तरी डोळ्यांच्या कडा ओलावून कासाविस होणं कमी झालं होतं. मुंबईहून कायमचे निघण्यापूर्वीचे म्हणजे गोकुळाष्टमी उत्सवानंतरचे ८-१० दिवस गुरुदेवांची 'अशी' भेट झाली नव्हती. निघण्याच्या आदल्या दिवशी भेट होईल असं वाटत होतं. पण नाही घडलं आणि ठाकूर कॉम्प्लेक्समधून उजवीकडे पुण्याच्या दिशेने गाडीने वळण घेतलं आणि बांध फुटला. गाडीत असणाऱ्यांना वाटत असेल मुंबई सोडली म्हणून हिला वाईट वाटतयं! पण मुंबई काय, पुणे काय, कुठेही चिकटून राहायचच नाही एवढं ध्यानात राहीलं होतं. पण माऊलीचं सगुण रुपडं पाहण्याचं, प्रत्यक्ष मिठीत न जाताही, दृष्टीच्या मिठीत जाण्याचा मोह मात्र काही क्षणासाठी का होईना त्रास देत होता. काही वेळातच आवरतं घेतलं.

माऊली दूर नसून जवळच आहे याच्या अभ्यासाठीच जणू माऊलीने देहाने दूर पाठवलं असावं! जाण्यापूर्वी ८-१० दिवस आधी माऊलीकडे गेले होते. कशासाठी तर पुण्याला गेल्यावर काय अभ्यास करू विचारायला! जाताना गणपती उत्सवामुळे एवढं ट्रफिक लागलं आणि पाऊसही लागला! आपल्या आतलं ट्रॅफीक जॅम माऊलींनी काढलंय, श्रवणाच्या पावसात भिजवलंय, साधनात अडकायचं नाही, सांगितलयं, तरी परत विचारायला गेलेच! माऊलींनी विचारलं, ''एवढ्याचसाठी आलीस? काहीही कर.'' खरं तर महीना-दीड महिन्याच्या उत्सवात रात्री मुलांच्या प्रश्नोत्तरामध्ये माऊलींनी सांगितले होतं, ''अभ्यास करायचा नसतो! साधायचा असतो!'' आपण फक्त ऐकतो, अंमलबजावणी होत नाही.

पुण्यात आल्यावर घराच्या आतलं नविनीकरणाच काम चालू होतं. माऊलीही साधकांच्या घरात नविनीकरण करीत असतात, पण कधी कळतं का? खरचं लताताई सारखी नक्कल करीत म्हणत असते, ''सारे कळत नकळतच घडते'', हेच खरे! काय आणि कसे घडत जाते कळतच नाही. आपण मंदिरात जातो म्हणून आपल्यात बदल घडवते म्हणावे तर अयोग्य आहे. सहजच 'सगळे' होत असते. माऊलीच्या

पायाशी लागावं आणि घट्ट पकडून ठेवलेले देह गळून पडावे तसे होते. नवीन घरात जाताना वर्षानुवर्षे साठवलेल्या कितीतरी वस्तू, ज्या अनावश्यक असतात त्या घरातून काढून टाकल्या जातात. त्यांचा मोह सोडला जातो. अगदी तसेच साधकाच्या घराचे आहे. माऊली आपल्याला हळुवारपणे कितीतरी गोष्टी काढून टाकायला लावतात.

अल्बर्ट आईनस्टाइनचं एक वाक्य वाचलं होतं, दोन गोष्टी जगात अनंत आहेत १. विश्व २. माणसाचा मूर्खपणा! पहिल्या गोष्टीचा अंदाज त्या आईनस्टाईनला पूर्ण नसावाही. पण दुसरं मात्र खरं असावं! आपण परत परत चुका करतोच! माऊली आटापिटा करतात पण माऊलीच्या अपेक्षेप्रमाणे काही आपल्याकडून वागणं होत नाही.

देहाची आई रात्रीचा दिवस करून बाळाची काळजी घेते वगैरे म्हणणं ठीक आहे. पण माऊलीच्या काळजीची तुलना कुठेतरी होऊ शकते का? ठराविक वेळात मूल घरी नाही आलं तर सगळ्यात जास्त तडफड देहाच्या आईची होते. इथे तर कित्येक जन्मांचा दुरावा आहे. आपला सर्वांचाच अनुभव आहे की १५ दिवस कुठे गावाला गेलं तर घरी आल्यावर सगळ्या वस्तू परत पहिल्यासारख्या सापडायला वेळ लागतो. इथे तर आपण घरच विसरलो होतो. प्रेमळ माऊलीच कुणाला तरी पाठवून (आपल्याला मंदिरात आणणारे गुरु) तिच्याजवळ आणते. युक्ती-प्रयुक्तीने तिच्याशी सांधलेलं राहण्यासाठी प्रयत्न करते. तिचे उपकार शब्दात तरी मांडता येतील का? आणि उपकार तरी कसे म्हणावं?

पुण्याला येऊन दोन महिने होत आले. एक दिवस फोन केला, लता म्हणाली, ''दोन दिवसांपासून गुरुदेव तुम्हाला फोन कर म्हणताहेत.'' त्याचवेळेस अर्चनाताईही म्हणाली,''कालपासून तुम्हाला फोन करायचं म्हणतेय, राहूनच गेलं,'' अंतरीची हाक पोहोचल्याशिवाय राहील का हो? लताताई म्हणे, 'या न हो तुम्ही दोन दिवस! गुरुदेव आणि सगळे तुमची वाट पाहताहेत.'' एवढं दोघीचं बोलणं ऐकूनच केवढा आनंद झाला. गुरुमाऊलीला भेटणार, बघणार असं वाटूनच खूप आनंद झाला. शनिवारी ४ तारखेला वाटलं, आपण ५ तारखेला एकादशीला जाऊ. खूप आनंद झाला होता, इतका की जाऊन गुरुमाऊलीला, गुरुभगिनींना मिठी मारावी. पण ६ तारखेला जायला मिळालं. थोडं हिरमुसलेपण आदल्या दिवशी आलं होतं. पण गुरुमाऊलीची ती युक्ती असावी. जसं दु:खाची तीव्रता कमी व्हायला पाहिजे (आतल्या आत)

**पान नं. १९ वर**

# उत्सव विशेष...✍

## श्रीसस माधुरीनाथ महाराज बोधतिथी उत्सव

**दि. १२ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०११**

*तृप्त करी माता। सद्गुरु तृप्त करी माता।।धृ।।*
*बोध पाने जीवा सुखवी। आनंद चित्ता।।१।।*
*धावाधाव ही सर्व आटोपली। आता काय चिंता।।२।।*
*दत्ता भागीरथी तृप्तीच तृप्ती। चिद्सागरी मीनता।।३।।*

## श्रीसस दत्तमहाराज पुण्यतिथी उत्सव

**३ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०११**

*निगुर्णरूप पहा म्हणती। तेचि ध्यान धरा चित्ती।*
*प्रकाश ज्योती संविती। समजा साक्षात्कार स्थिती।।१।।*
*दिसे भासे होय नाश। सरे ते पहा निराभास।*
*पाहते पहाणे करा ग्रास। तरीच चुकती यमपाश।।२।।*
*ऐसे बोलती उदंड। वाटे सर्वही थोतांड।*
*एकेविण एक जे प्रचंड। तेथे न चले द्वैत बंड।।३।।*
*पाहणे सोडुनी पाहणे व्हावे। होणे न होणे ते सांडावे।*
*निर्गुण रूप हे समजावे। जाणणे गिळूनी राहावे।।४।।*
*सांगे दत्ता भागीरथी। रूप पाहण्याची हे युक्ती।*
*करूनि शंका निवृत्ती। दिधली रूपा अरूप स्थिती।।५।।*

## श्रीसस दत्तमहाराज जयंती उत्सव

**२ जानेवारी ते १२ जानेवारी २०१२**

*तंतू प्रेमाचा। परब्रह्माचा सगुण भगवंताचा।*
*मज कळो आला, आजि साचा मी वरी धागा त्याचा।।१।।*
*ऐके परम। तू ब्रह्म उपदेशिले निजवर्म।*

# संपादकीय...✍

भौतिक वस्तुंचे ज्ञान झाल्यावर भौतिक शास्त्राचा विस्तार शास्त्रज्ञांनी पुढे नेला. परंतु त्याला भौतिकाच्या चौकटीतच अडकावे लागते. एका टप्प्यानंतर ते स्तिमितच होते. परंतु महाराजांच्या कक्षांना मर्यादाच नाहीत. म्हणूनच ते इतर सर्व शास्त्रांना आपल्यात सामावून घेते. याचा अनुभव **'सदाचरण'** वाचताना येईल. सायन्सचा अभ्यास केलेल्या सर्वांनाच या अलौकिक ज्ञानाचा आनंद घेता घेता आपले तर्कशास्त्र किती तोकडे पडते याची अनुभूती येईल.

परंतु हे ज्ञान मिळणे तर सहजी शक्यच नाही. त्यासाठी सद्‌गुरुंची आवश्यकता असते आणि सद्‌गुरु मिळणे किती अवघड असते याचा प्रत्यय **'भक्तगाथे'**तील श्रीसस नारायण महाराजांच्या गोष्टीतून समजते. तसेच श्रीसस बलभीम महाराज यांनाही श्रीसस लक्ष्मण महाराज भेटावयास किती मोठी तपश्चर्या करावी लागली हे जाणवते. पण म्हणूनच जसे सोने अग्निपरिक्षेने झळाळते तसेच या दोघांनीही आपल्या आयुष्याचे कसे सोने केले हे निदर्शनास येते.

अशाच प्रकारचे कष्ट महाकवी कालिदासाने त्याच्या आयुष्यात केले. याचे वर्णन **'गोजिरवाणी'**त आले आहे.

सद्‌गुरुसंगाची ओढ साधकाच्या अंतःकरणाला कशी लागते याचे सुरेख वर्णन 'अहो ऐकलतं का?' वाचताना येईल. संग लाभल्यावर मात्र ज्ञानभोजनाची रूची कशी वाढते यांचा प्रत्यय 'रुचि रूचि भोजन करो मोरे लाला...' वाचताना येईल.

'तरुणाई'ला पडलेले प्रश्न **'गुंजारव'** मध्ये दिसतात. म्हणूनच **'गोजिरवाणी'** व **'तरुणाई'**च्या वाचकवर्गाकडून काहीतरी प्रतिसाद मिळावा या अपेक्षेने **'शब्द तेच छेडिता, अर्थ उमगले नवे, आज लाभले सखी, सौख्य जे मला हवे'** हे नवीन सदर सुरु करीत आहोत. विविध प्रकारची गाणी आपण ऐकत असतो. पण काही गीते आपल्या आतमध्ये संवाद साधतात. बुद्धी सखीशी संवाद साधताना महाराजांचे बोल तिथे स्पष्ट ऐकु येतात. हाच संवाद इथे अपेक्षित आहे. सर्व वयोगटातील वाचकांनी कृपया याची दखल घ्यावी व भरभरून प्रतिसाद द्यावा हीच सद्‌गुरुचरणी प्रार्थना!

– श्रीसमज –

*झालो जागृत, कळले मी कोण, निस्सीम।।२।।*
*सत्, चिद्, आनंद, निर्द्वंद्व केवळ ब्रह्मानंद।*
*लक्षणे असती, विशुद्ध, स्वसंवेद्य सिद्ध।।३।।*
*गमनागमन, अघटमान, अचल निर्गुण।*
*नभसमव्यापक, परिपूर्ण, अखंड दंडायमान।।४।।*
*शरीर हे दृश्य, अदृश्य, द्रष्टा अपरोक्ष।*
*सर्वदा देखणा, शुन्यभासदृश्य। चेतन साक्षी अलक्ष।।५।।*
*दत्ता भागीरथी बोधशक्ती, अपूर्वता ते युक्ती।*
*स्थिति अनुभाव्य निश्चिती, धन्य धन्य गुरुमूर्ति।।६।।*

◈◈◈

---

**पान नं. १७ वरून**

तसेच आनंदाची झळाळी जिरायला पाहिजे. प्रत्यक्षात गेले तेव्हा खूप आनंद किंवा दु:ख झालं नाही. चार दिवस रहायला मिळालं. दिवस कसे गेले कळलेच नाही. श्रीसस दत्तात्रेय महाराज पुण्यतिथी उत्सव चालू होता. सकाळी काकड्यातून देवाच्या बालरूपाशी जवळीक साधून आनंद लुटायचा! प्रसाद झाला की अविनाश भाऊंची पोथी (सदाचार) असायची! त्याच्यात आधीच्या कथांचा धागा असायचाच! दुपारी गुरुदेवांची पोथी नंतर प्रसाद! त्यानंतर भजन मग संध्याकाळी कथा व रात्री टिपऱ्यांची, नाचणाऱ्यांची आणि गाणाऱ्यांची जुगलबंदी! झोपण्यापूर्वी परत दासबोध वाचन व गुरुगीता वाचन! सगळीच बहार व धमाल! 'निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे' म्हणावं लागेल. शुभांगी शुक्रवारी सकाळी निघणार होती. गुरुवारी रात्री मुलं (सिद्धेश, चिन्मय, गौरी, आरती) म्हणाली, 'काकू आपण रात्रभर दासबोध वाचन आणि भजन चालू ठेवुयात.' पण तसं ते झालं नाही. म्हटलं, ''बरं! जशी माऊलींचा इच्छा!'

गुरुमाऊलींच्या जास्तीत जास्त सहवासात आणि गुरुभक्तांच्या मेळ्यात राहण्याचा आनंद वेगळाच असतो. घरचे कुठले फोन वगैरेपण नकोसे वाटतात. सगळ्यापरीनं तृप्त करून, इच्छा पुरवून निजानंदात राखण्यासाठी माऊली निजतृप्ती चाखवतेच! पुढची भेट मात्र कमी वेळासाठी न होता दीर्घकाळ गुरुमाऊलीच्या सहवासात राहता यावं याची ओढ घेऊनच साधक मंदिरातून बाहेर पडतो!

'हेचि दान देगा देवा, संत संग देई सदा!'

◈◈◈

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

To,

BOOK-POST

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१ दि. २ जाने ते ११ जाने. २०१२

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. १८ फेब्रु. ते २० फेब्रु २०१२

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. ४ मार्च ते १२ मार्च २०१२

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १४ दि. ३० एप्रिल ते ६ मे २०१२

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५ दि. २५ जून ते ४ जुलै २०१२

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. २५ जुलै ते ३१ जुलै २०१२

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. २१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१२

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |

**अधिक भाद्रपद १८ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०१२**